बुधवार दि.१९ फेब्रुवारी २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
–अॅड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक लोकनेता
बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१५७ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in




# शून्यातून हिंदवी स्वराज्य उभारणारे छत्रपती शिवाजी महाराज!

लोकनेता न्यूज नेटवर्क



छत्रपती शिवाजी महाराज हे या देशाचे अद्भुत आणि शाश्वत असे स्फूर्तीस्थान आहेत ! पाच पातशाह्यांशी शक्ती आणि युक्ती यांच्या सामर्थ्यावर लढा देऊन हिंदू शक्तीशाली मोगलांना आव्हान देऊ शकतात, हे छत्रपती शिवाजी महाराजांनी शक्य करून दाखवले ! सर्व वीरांचे आदर्श स्थान असलेल्या शिवाजी महाराजांनी १६७४ मध्ये शेकडो वर्षांनंतर हिंदु धर्म आणि संस्कृती यांचा महाशक्तीशाली आणि बलाढ्य राजसत्तेचा भगवा झेंडा रायगडावर फडकवला ! छत्रपती शिवरायांनी स्थापन केलेले हे हिंदवी स्वराज्य आणि त्याच्या स्थापनेची प्रक्रिया ही संपूर्णतःच एक दैवी प्रक्रिया होती. स्वाभिमानशून्य हिंदूंना लढण्याची प्रेरणा देणे आणि हिंदवी स्वराज्य स्थापनेची निर्मिती करणे ही एक बुद्धीगअगम्य घटनाच म्हणावी लागेल ! छत्रपती शिवरायांची भवानीमातेवर निःस्सीम श्रद्धा होती. त्यांच्या मुखात अखंड जगदंब जगदंब । असे उच्चारण असे. भवानीमातेने त्यांना प्रत्यक्ष दर्शन देऊन प्रसादरूपी भवानी तलवार प्रदान केली. या तलवारीच्या बळावर त्यांनी पुढे महापराक्रम गाजवून हिंदूंना छळणार्या मोगलरूपी दुर्जनांचा नाश केला !


वयाच्या १६ व्या वर्षी शिवरायांनी रायरेश्वरावरील शिवपिंडीवर रक्ताच्या धारेचा अभिषेक करून हिंदवी स्वराज्य स्थापनेची शपथ घेतली होती. पुढे देव, देश आणि धर्म यांच्या रक्षणासाठी त्यांनी आपले सर्व आयुष्य वेचले. छत्रपतींच्या जीवनातील अफझलखानाचा वध, आग्याहून सुटका, सिंहगड जिंकणे आदी सार्याच एकापुढे एक घडणार्या वैशिष्ट्यपूर्ण घटना या कुठल्या दैवी चमत्कारांपेक्षा अल्प नव्हत्या ! त्यामुळे क्रूरकर्मा शत्रूही अवाक् झाला होता ! स्वत:च्या प्राणांची तमा न बाळगता त्यांनी मानवी रूपातील अनेक दैत्यांचे पारिपत्य केले. पुढे हिंदूंच्या रक्षणासाठी महाराजांनी स्वतःला विधिवत् राज्याभिषेक करवून घेऊन हिंदवी स्वराज्य स्थापनेची घोषणा केली ! छत्रपती शिवाजी महाराजांचा हेतू हिंदवी स्वराज्य स्थापनेचा होता. तत्पूर्वी शेकडो वर्षे दक्षिण आणि उत्तर हिंदुस्थानात यवनी राजवटींनी हैदोस घातला होता. समर्थ रामदासस्वामींनी या परिस्थितीचे वर्णन करतांना म्लेंच्छ दुर्जन उदंड । बहुता दिसांचे माजले बंड ।, असे म्हटले आहे. यवनांचे आक्रमण उघड-उघड धर्मांध होते. त्यामुळे मोगल सत्ता उलथून श्रींचे राज्य स्थापन करणे हा छत्रपती शिवाजी महाराजांचा हेतू होता. हिंदवी स्वराज्याच्या स्थापनेचे व्रत महाराजांनी श्रींची इच्छा म्हणूनच स्वीकारले होते. त्यासाठी आवश्यक अशा पराकोटीच्या त्यागाचे सामर्थ्य त्यांच्यामध्ये धर्माचरणाने, भवानीमातेच्या उपासनेने आणि सद्गुरूंच्या कृपाशीर्वादाने निर्माण झाले होते.

छत्रपती शिवाजी महाराजांनी पुरंदरच्या तहाच्या आडून सर्वोत्कृष्ट आणि धाडसी चाल आखली. तहानुसार त्यांनी औरंगजेबाला २३ किल्ले परत दिले. त्या कालावधीत महाराजांनी राजा जयसिंहास विजापूरच्या स्वारीवर साहाय्य करून विजय मिळवून दिला. त्यामुळे प्रसन्न होऊन औरंगजेबाने चर्चा करण्यासाठी महाराजांना आग्र्याला येण्याचे निमत्रंण दिले. या संधीचा लाभ उठवण्याचा धाडसी निर्णय महाराजांनी घेतला. वास्तविक स्वराज्याचा सर्वात मोठा शत्रू असलेल्या क्रूर औरंगजेबाच्या २ सहस्र कि.मी.पेक्षा जास्त अंतरावर असलेल्या आग्र्यातील दरबारात स्वतःहून जाणे, म्हणजे वाघाच्या जबड्यात स्वत:हून हात घालण्यासारखे आहे, हे महाराज जाणून होते. तेथे आपल्याला धोका होणार, हेही यवनांची कूटनीती जाणणार्या महाराजांना ज्ञात होते; पण हिंदवी स्वराज्यासाठी पराकोटीच्या त्यागाची सिद्धता ठेवणार्या आणि ईश्वरावर निष्ठा असणार्या महाराजांनी ही संधी साधली. औरंगजेबाच्या दरबारात हिंदुस्थानातील अनेक हिंदु राजे आणि सरदार चाकरीला होते. मोगलांच्या सेवेमध्ये त्यांच्या अनेक पिढ्या खपल्या होत्या. अशा भरलेल्या दरबारात महाराजांनी प्रवेश केला आणि मी हिंदु राजा असतांना मला सरदारांच्या रांगेत उभे केले, असे म्हणून ते मोगल बादशहा औरंगजेबासमोर उभे राहून सर्वांसमोर त्याचा अपमान करून भर दरबारातून निघून गेले. त्यामुळे औरंगजेबाने महाराजांना अटक करून नजरकैदेत ठेवले आणि त्यांना ठार मारण्याची योजना आखली; मात्र महाराज अलौकिक साहस अन् बुद्धीमत्ता यांच्या क्षमतेवर औरंगजेबाचा कडेकोट बंदोबस्त तोडून पुन्हा स्वराज्यात सुखरूप परत आले. हे एखाद्या चमत्कारापेक्षा वेगळे नव्हते. महाराजांची हिंदूंचे तेज जागवण्याची मोहीम यशस्वी झाली होती. पुढे त्याचे परिणाम दिसणार होते.

छत्रपती शिवाजी महाराज आग्र्याहून निसटल्यावर औरंगजेबाची विलक्षण बदनामी झाली. महाराजांच्या मुत्सद्देगिरीची आणि पराक्रमाची कीर्ती मात्र जगभर पसरली. महाराजांच्या या सुटकेने प्रेरणा घेऊन अनेक हिंदू मोगलांविरुद्ध उभे राहिले. आसाममधील लांच्छित बडफूकन हा त्यापैकीच एक वीर योद्धा मोगलांविरुद्ध लढला. औरंगजेबाचा सेनापती राजा जयसिंहाचा मुलगा राजा रामसिंग हा शिवाजी महाराजांचा हितचिंतक झाला. उत्तर हिंदुस्थानातून भूषणसारखे कवी आणि छत्रसाल बुंदेलासारखे वीर महाराजांच्या आश्रयाला आले. छत्रपती शिवाजी महाराजांची आग्रा येथील मोहीम ही हिंदवी स्वराज्य स्थापनेतील निर्णायक मोहीम ठरली. महाराज आग्र्याहून निसटल्यावर मोगल साम्राज्यास खरी उतरती कळा लागली. पुरंदरच्या तहात द्यावे लागलेले सर्व किल्ले आणि प्रदेश महाराजांनी पुन्हा जिंकून घेतले. महाराजांना अनेक हिंदू राजे आणि सरदार यांचे सहकार्य मिळू लागले. हिंदवी स्वराज्याचा विस्तार दक्षिणोत्तर अशा दोन्ही दिशांना होऊ लागला. औरंगजेबाचा हिंदु सरदारांवरील विश्वास उडाला आणि छत्रपती शिवाजी महाराजांचा बंदोबस्त करण्यासाठी त्याला स्वतःला ५ लाखांच्या सैन्यानिशी दक्षिणेची मोहीम उघडावी लागली. आदिलशाही आणि निजामशाही त्याने १-२ दिवसांतच संपवली; मात्र स्वसामर्थ्याची जाणीव झालेल्या मराठ्यांनी त्याला जवळपास २५ वर्षे झुंजवले आणि शेवटी त्याचा याच हिंदवी स्वराज्यात मृत्यू झाला.

कवी भूषण म्हणतात, शिवाजी महाराजांनी वेदांचे, प्रसिद्ध पुराणांचे रक्षण केले. जिव्हेवर रामनाम ठेवले. हिंदूंची शेंडी राखली. शिपायांची रोटी राखली. खांद्यावरच्या जानव्याचे आणि गळ्यातल्या माळेचे रक्षण केले. मोगलांना थोपवले. बादशहाला धाक घातला. शत्रूंना चक्की पिसायला लावली. सीमांचे रक्षण केले. तलवारीच्या बळावर देव, देश आणि स्वधर्म यांचे रक्षण केले अन् या सर्वांतून हिंदूच्या मनात जाज्वल्य प्रेरणाशक्ती निर्माण केली.

**–जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**






# शिवजन्मोत्सवानिमित्त आयोजित शिवशाही महानाट्याचालाभ शिवप्रेमींनी घ्यावा-आ.विजयसिंह

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**गेवराई । ज्ञानेश्वर उदावंत**



छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन कार्यावर आधारित शिवशाही या ऐतिहासिक महानाट्याचे तीन प्रयोग शिवजन्मोत्सवानिमित्त आयोजित केले असुन शिवप्रेमी नागरीकांनी त्याचा लाभ घ्यावा असे आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी केले आहे. शिवजन्मोत्सवानिमित्त आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी सुप्रसिद्ध सिने अभिनेत्री अलका कुबल, शंतनु मोघे, महानाट्याचे दिगदर्शक महेंद्र महाडिक यांच्यासह राष्ट्रवादी सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.


राष्ट्रवादी सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा समितीच्या वतीने बुधवार दि. १९ ते २१ फेब्रुवारी दररोज सायंकाळी ७ वा. र.भ. अट्टल महाविद्यालयाच्या मैदानावर शिवनगरी येथे शिवशाही या ऐतिहासिक महानाट्याचे विनामुल्य आयोजन करण्यात आले आहे. शुभारंभाचा पहिला प्रयोग सर्वांसाठी असुन गुरुवार दि. २० रोजीचा प्रयोग केवळ महिलांसाठी आणि शुक्रवार दि. २१ रोजीचा प्रयोग शालेय विद्यार्थ्यांसाठी आयोजित केला आहे. या संदर्भात समितीच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत संस्थापक अध्यक्ष आ. विजयसिंह पंडित यांनी सविस्तर माहिती दिली. शिवशाही महानाट्याच्या रंगमंचावर झालेल्या पत्रकार परिषदेला सिने अभिनेत्री अलका कुबल, अभिनेते शंतनु मोघे, दिगदर्शक महेंद्र महाडिक, सिने अभिनेते प्रकाश धोत्रे, महेश कोकाटे, रमेश रोकडे, डॉ. राजेश आहेर, समितीचे अध्यक्ष शैलेश तोष्णीवाल, कार्याध्यक्ष संदिप मडके, सभापती मुजीब पठाण आणि युवानेते रणविर पंडित यांच्यासह समितीचे पदाधिकारी, पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पाच मजली किल्ल्याची हुबेहुब प्रतिकृती, शोभीवंत सिंहासन मेघडंबरी, जहाजाचा वापर करुन महाराजांच्या कोकण मोहिमेचा जिवंत देखावा, भव्य राज्याभिषेक सोहळा, शिवकालीन शस्त्रास्त्रे व युद्ध साहित्य यासह अधुनिक ध्वनी व प्रकाश योजना, घोडे, बैलगाडी, पालखी, नेत्रदिपक अतिषबाजी यांचा वापर करुन मराठा व पातशाही यांच्या तलवारींचा खणखणाट, तोफांचा गडगडाट, अग्नीबाणांचा वर्षाव असा घनघोर रणसंग्राम याच देही पाहण्याचे सौभाग्य गेवराईकर शिवप्रेमींना लाभणार असल्याचे आ. विजयसिंह पंडित यांनी यावेळी सांगितले. पुढे बोलतांना ते म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्त डिजेच्या तालावर थिरकनारी मद्यधुंद तरुणाई या माध्यमातुन निर्माण झालेल्या अनिष्ट परंपरा मोडित काढुन खर्या अर्थाने जयंतीचे शिवजन्मोत्सवात रुपांतर करण्याचे काम या माध्यमातुन आम्ही करत आलो आहोत असे आ. पंडित यांनी यावेळी सांगितले.सिने अभिनेत्री अलका कुबल यांनी आ. विजयसिंह पंडित यांच्या कार्याचे कौतुक करुन गेवराई सारख्या ग्रामीण भागातील प्रेक्षकांना या ऐतिहासिक महानाट्याची पर्वणी उपलब्ध करुन दिल्या बद्दल आभार मानले. राजकीय नेते निवडणुक जिंकण्यासाठी असे कार्यक्रम आयोजित करतात मात्र आ. पंडित यांनी निवडुन आल्यानंतर सुद्धा अशा महानाट्याचे आयोजन करणारा आ. विजयसिंह पंडित यांच्यासारखा एकमेव नेता आम्ही पाहिला असल्याचे गौरवोद्गार महानाट्याचे दिगदर्शन महेंद्र महाडिक यांनी काढले. गेवराईच्या मातीतील कलावंताना महानाट्यात काम करण्याची संधी दिल्या बद्दल आ. पंडित यांनी त्यांचे आभार मानले. या महानाट्याचा लाभ सर्व शिवप्रेमी नागरीकांनी घेण्याचे आवाहन या निमित्ताने आ. पंडित यांनी केले.राष्ट्रवादी सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा समिती व नगर परिषद, गेवराई यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार दि. १९ फेब्रुवारी रोजी सकाळी १०:३० वा. गेवराई शहरातील बाजार तळ येथे छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करण्यात येणार आहे. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज बाल उद्यानाचे लोकार्पण या निमित्ताने भवानी अर्बन बँकेचे अध्यक्ष बप्पासाहेब मोटे यांच्या शुभहस्ते तर आ. विजयसिंह पंडित यांच्या प्रमुख उपस्थित होणार आहे. या प्रसंगी शिवप्रेमी नागरीकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले.

# कंधार येथे शिवजन्मोत्सवानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**



हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मोत्सवानिमित्त कंधार येथे कंधार कॉलेज ऑफ फॉर्मसी व भारतीय जनता पार्टी कंधार च्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे.

दि.१९ फेब्रुवारी रोजी शिवजन्मोत्सवाच्या अनुषंगाने विविध सामाजिक उपक्रम साजरा करण्याचा निर्धार शिवप्रेमींनी केला आहे,त्याच अनुषंगाने कंधार येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे कंधार कॉलेज ऑफ फॉर्मसी व भारतीय जनता पार्टी कंधार च्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे,या रक्तदान शिबिरात जास्तीत जास्त संख्येने शिवभक्तांनी सहभागी व्हावे व रक्तदान करावे असे आव्हान जिल्हा परिषदेचे माजी सदस्य ड विजय धोंडगे व पंचायत समितीचे सदस्य डॉ.सुनील धोंडगे यांच्या वतीने करण्यात आले आहे..

# मोटरसायकलचा ताबा सुटल्यांने कठड्यावर चढून विद्युत खांबाचा मार अशोक पाटील यांचा जागीच ठार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर । जयपाल दावनगीरकर**

देगलूर तालुक्यातील भुतनहिप्परगा येथील माजी उपसरपंच, सामाजिक कार्यकर्ते, गावातील गोरगरिबावर अन्याय, अत्याचार भांडण तंटे तळमळीने सत्य ते सत्य अशी भूमिका घेऊन न्याय मिळवून देण्यासाठी एकमेव कार्यकर्ते अशोक पाटील यांची ओळख होती. अशा कार्यकर्त्यावर काळाने झेप घेतला गरीबांचा कार्यकर्ता हरवला म्हणून गाव हळहळत होते. तेलंगणा राज्यातील नारायणखेड मंडल मधील असलेल्या डांबरगीड्डा या गावी नातेवाईक पाहुण्यांच्या घरी साखरपुड्याच्या कार्यक्रमासाठी गेले कार्यक्रम आटोपून मोटार सायकलवरून एकटेच परत भु.हिप्परगा गावी येत असताना अर्ध्या रस्त्यात अशोक पाटील यांचा मोटार सायकलवरचा ताबा सुटल्यांने काळाने झेप घालून तेलंगणा राज्यातील कंगठी गावातील रस्त्यावर असलेल्या कठड्यावर मोटारसायकल चढून कठड्यावरील विद्यूत खांबाला जबरदस्त डोकं आदळून डोक्यातील रक्ताचा भंबाळ सडा झाला असल्याने अशोक पाटील यांचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली.



या घटनेची माहिती नातेवाईकांना वाऱ्यासारखी पसरली त्यावेळी जसे जमेल तसे नातेवाईक घटना स्थळी पोहचल्यावर तेलंगणातील पोलीसांनी पंचनामा करून मृतदेह नारायणखेड आरोग्य केंद्रात शवविच्छेदन करून शवविच्छेदनानंतर अशोक पाटील यांचे मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले. अंत्यसंस्कार काल १७ फेब्रुवारी दुपारी १२:३० वाजता भुतनहिप्परगा गावी करण्यात आला. अशोक पाटील यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगा, तिन मुली, नातू, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# धानोरा बु.येथे झाडांची होते सरास दररोजच कत्तल!

## प्रशासन मात्र मुग गिळून गप्प आदा तेरा आदा मेरा?


■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी । महेश पडोळे**

उमरी तालुक्यातील धानोरा बु.येथे रोड लगतील झाडांची होते सरास दररोजच रात्री कत्तल यात वन प्रशासन मात्र मेहरबान होतं असल्याचं चित्र दिसुन येत आहे.

सदर, गेलीं दोन महिन्यांपासून सतत रात्र दिवस गुत्तेदार दलाल मिळुन कमी दरात गैरी रोड लगतील झाडांची दररोजच विक्री करून भट्टीला नेत आहेत यात स्थानिक अधिकारीआदा तेरा आदा मेरा हा गोरख धंदा चालू आहे.याकडे वनविभाग नांदेड भोकर प्रशासन मात्र काना डोळा करत आहेत अशी चर्चा नागरिकांतून होत आहे.

शासन लोकांना सांगतो झाडे लावा, झाडे जगवा तुम्ही, वनविभाग सांगतो झाडे तोडण्यास परवाना देतो आम्ही उमरी वनविभाग क्षेत्रात झाडांची कत्तलीचे विदारक वास्तव दिसते आहे समोर.ग्लोबल वॉर्मिंगच्या दुनियेत सर्वत्र मोठ्या प्रमाणात तापमानात वाढ होऊन पर्यावरणाचा समतोल ढासळत असताना यावर एकमेव उपाय म्हणजे वृक्ष लागवड करून त्यांचे संवर्धन करणे.आजच्या इंटरनेटच्या युगात श्वास घेत जगायचे असेल तर प्रत्येक नागरिकाचे झाडे लावा व ती जगवा हे



कर्तव्य आहे.असे आवाहन सातत्याने शासन वेगवेगळ्या योजनांचे अनुदान खर्च करून बोंबलून, बोंबलून सांगतो आहे. शासन जसे सांगत आहे तसे ग्रामीण भागातील लोक वागत आहेत. कृती पण करीत आहेत मात्र वन विभाग मालकीच्या नावाने उघड्या डोळ्यांनी वृक्ष तोड करण्यास ठेकेदारांना परवाना देत असल्याचे विदारक वास्तव उमरी तालुक्यात पाहायला मिळत आहे.निसर्ग चक्री वादळात मोडतोड झालेल्या झाडांचे वन विभातर्फे विल्हेवाट लावली होतीच ती कमी पडली की काय लगेच उमरी तालुका वन विभाग खासगी ठेकेदारांना वृक्ष तोड करण्यास परवाना देवुन काय साध्य करायचे आहे असे नागरीकांचे म्हणणे आहे.वृक्ष तोड थांबवावी यासाठी आता पर्यावरणप्रेमींनी संघटीत होऊन उमरी तालुक्यातील धानोरा बु. भरमसाठ होत असलेली वृक्ष तोड थांबवावी अशी अपेक्षा सामान्य नागरिक जाहीरपणे बोलताना करीत आहेत.

# मातृतीर्थ सिंदखेड राजा येथे शिव जयंती नित्तीत शिवगीतांचे आयोजन



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमीत्त मातृतीर्थ सिंदखेड राजा येथे भव्य कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. शिवजयंती उत्सव समितीने पत्रकार परिषद घेऊन या संदर्भातील माहिती दिली आहे.

सिंदखेड राजा येथे घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत प्रदीप बिल्होरे यांनी शिवजंतीनिमित्त कार्यक्रमांची रूपरेषा कशी असेल हे सांगितले. सायंकाळी ४ वाजता भव्य मिरवणुक ही शहरातून काढणार असून महापुरूषांच्या पुतळ्यांना अभिवादन करून जिजाऊ जन्म स्थळ सिंदखेड राजा येथे येणार असून राष्ट्रमाता जिजाऊंच्या पुतळ्यांना अभिवादन करून राजवाड्या समोर भव्य शिवगीतांचा कार्यक्रम हा आयोजित करण्यात आला आहे. असे पत्रकार परिषद घेऊन त्यांनी माहिती दिली. तरी या कार्यक्रमा साठी शहरातील नागरिकांनी हजर राहण्याचे आव्हान प्रदीप बील्होरे यांनी केले आहे. या वेळी शिवजयंती उत्सव समिती अध्यक्ष चंदुभाऊ साबळे,बाळासाहेब शेळके, अशोक राजे जाधव,राजू आढाव यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

# एक मैफील कडून कवी रफिक इनामदार साहित्यरत्न तर प्रदीप केदारी कामगाररत्न पुरस्काराने पुरस्कृत

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**हवेली । संतोष कदम**

एक मैफिल कवितांची साहित्य मंच आयोजित काव्य स्पर्धा व पुरस्कार वितरण सोहळा श्रीगोंदा तालुक्यातील पिंप्री कोलंदर येथे १६ फेब्रुवारी रोजी २०२५ रोजी मोठ्या थाटामाटात संपन्न झाला. कार्यक्रमाला महाराष्ट्रातील विविध भागातील व हैदराबाद येथूनही काही साहित्यिक मंडळींनी हजेरी लावली होती. सर्व कवींनी आपल्या बहारदार रचना सादर करून सभागृहातील प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले व त्यांची मने जिंकली. प्रेक्षकांसाठी ही एक पर्वणीच होती. या सोहळ्यात अध्यक्षस्थानी प्रसिध्द कवी रज्ज़ाक शेख तर उद्घाटक म्हणूण धोत्रे महाराज होते.




कार्यक्रमात कवी रफिक इमानदार यांना साहित्यरत्न पुरस्कार देऊन व प्रदीप केदारी यांना कामगार रत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. कवी सोमा चौधरी यांनाहि काव्यरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. काव्य स्पर्धेचे परीक्षण प्रसिद्ध कवी लेखक सागर रामचंद्र काकडे यांनी केले व प्रसिद्ध कवी प्रमोद घोरपडे हेही या कार्यक्रमाला उपस्थित होते. मराठी साहित्य चळवळ वृद्धिंगत व्हावी यासाठी राबणार व्यक्तीमत्व म्हणजे प्रसिध्द कवी महाबली मिसाळ व कुमोद रणदिवे यांचे आभार सर्वांनी मानले.या सुंदर कार्यक्रमाचे आयोजन महाबली मिसाळ व कूमोद रणदिवे यांनी केले तर सुत्र संचालन कवी आनंद डोळस यांनी केले.

ह्यात महाराष्ट्रातील विविध भागातून व हैद्राबाद येथून हि कवी उपस्तित होते. सर्व कविनी आपल्या बहारदार रचनेतून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले ह्या कार्यक्रमात कवी रफिक इनामदार ह्यांना साहित्यरत्न पुरस्कार देऊन व प्रदीप केदारी ह्यांना कामगाररत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. व कवी सोमा चौधरी ह्यांना काव्य रत्न पुरस्काराने सन्मानित केले सदर कार्यक्रमा त अध्यक्ष स्थानी कवी रज्ज़ाक शेक होते कार्यक्रमाचे उदघाटक धोत्रे महाराज होते तसेच ह्या भव्य अश्या कार्यक्रमाचे परीक्षण प्रसिद्ध कवी लेखक सागर रामचंद्र काकडे ह्यांनी केल. ह्या कार्यक्रमा चे आयोजन प्रसिद्ध कवी महाबली मिसाळ व कुमोद रणदिवे ह्यांनी केले होते.


# सार्वजनिक शिवजन्मोत्सव समिती कडून श्रीगोंद्यात शिवजयंती निमित्त विविध स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**

सार्वजनिक शिवजन्मोत्सव समिती श्रीगोंदा शहरात सन २०१२ पासून शिवजयंती मोठ्या उत्साहाने साजरी करत आहे. यंदा दोन दिवसीय भव्य शिवजयंती आयोजित करण्यात आली असून तालुक्यात प्रथमच अकरा फुट उंचीच्या शिव प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. बाल कलाकार आणि मावळे छत्रपती शिवाजी महाराजांच्या विविध पैलूंचे दर्शन विविध स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून करणार आहेत. ह.भ.प. प्रदीप महाराज सोळुंखे यांचे शिवकिर्तन होणार असून सदरील कार्यक्रमास तालुक्यातील राजकीय सामाजिक क्षेत्रातील सर्व नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच सर्व आजी माजी नगरसेवक, सर्व सरपंच, उपसरपंच, चेअरमन आणि तमाम शिवप्रेमी उपस्थित राहणार असल्याची माहिती सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीचे अध्यक्ष बालु मखरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सालाबादप्रमाणे बहुजन प्रतिपालक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९५ व्या जयंतीनिमित्त दोन दिवसीय विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये मंगळवार दि. १८ फेब्रुवारी रोजी श्रीगोंदा नगरपरिषदेच्या सांस्कृतिक भवन, पंतनगर येथे रांगोळी स्पर्धा सकाळी १० ते दुपारी २ पर्यंत होणार असून सायंकाळी २ ते ६ दरम्यान छत्रपती बाईक रॅली व रथ यात्रा श्रीगोंदा शहरातून निघणार आहे. क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांना मानवंदना देण्यासाठी फुले सर्कल येथे सावित्रीबाई फुले यांचे वंशज डॉ. नूतन लोणकर–नेवसे यांच्या हस्ते राष्ट्रपुरुष दिप प्रज्वलन दिपोत्सव कार्यक्रम सायं. ६:३० ते ७:०० वा.च्या दरम्यान होणार आहे.



शिवजयंतीच्या दिवशी सकाळी ६:०० ते ७:३० वाजेपर्यंत छत्रपती मॅरेथॉन स्पर्धा जोधपुर मारुती चौक येथे घेण्यात येणार आहे. यानंतर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन सकाळी ९:०० वा. माजी मंत्री बबनराव पाचपुते, खा. निलेश लंके, मा.आ. राहुल जगताप, आमदार विक्रम पाचपुते, शिवसेनेचे उपनेते साजन पाचपुते, नागवडे कारखान्याचे चेअरमन राजेंद्र नागवडे, काँग्रेसचे जेष्ठ नेते घनश्याम शेलार, मा. नगराध्यक्ष मनोहर पोटे, बापू गोरे, बाळासाहेब नाहाटा, अशोक खेंडके, तहसिलदार डॉ. क्षितिजा वाघमारे, पोलिस निरीक्षक किरण शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात येईल. यावेळी श्री शनैश्वर भजनी मंडळाचा सदस्या बाल शिवाजी राजेंचा पोवाडा सादर करणार आहेत. तसेच वेशभूषा स्पर्धा व सांस्कृतिक पथक संचलन होणार आहे. स.१०:०० ते ११:०० या वेळेत पालखी मिरवणूक श्रीगोंदा शहरातून निघणार आहे. सायं. ५ वाजता लहान मुलांची भाषणे व बाल सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात येईल. सायं. ८ वाजता ह.भ.प. प्रदीप महाराज सोळुंखे यांचे शिवकिर्तन होणार असून शिवकिर्तनानंतर उपस्थित नागरिकांसाठी स्नेहभोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे रांगोळी स्पर्धा, छत्रपती बाईक रॅली व रथ यात्रा, छत्रपती मॅरेथॉन स्पर्धा, वेशभूषा स्पर्धा, लहान मुलांची भाषणे व बाल सांस्कृतिक कार्यक्रम या सर्व स्पर्धांसाठी नावनोंदणी करावी. रविवार दि. २३ फेब्रुवारी रोजी श्री संत शेख महंमद महाराज मंदिर येथे स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात येणार असून मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिक वितरण कार्यक्रम होणार आहे. सर्व स्पर्धा यशस्वी करण्यासाठी श्रीगोंदा शहरासह तालुक्यातील राजकीय, सामाजिक संघटना व तरुण मंडळे यांसह विद्यार्थी व नागरिकांनी सक्रीय सहभाग नोंदवावा व शिवजयंतीसह सर्व सांस्कृतिक कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीचे अध्यक्ष बालू मखरे, उपाध्यक्ष चांदणी खेतमाळीस, कार्याध्यक्ष मीरा शिंदे, खजिनदार राजश्री शिंदे, सचिव मीरा खेंडके, ज्योती खेडकर, मार्गदर्शक अरविंद कापसे, राजेंद्र राऊत, शाम जरे, अजिजभाई शेख, गोरख घोडके, परिश जाधव, दिपक मखरे यांनी केले आहे.

# करंजी येथील शेतकऱ्याचा शॉर्टसर्किट मुळे पाच एकर ऊस जळून खाक

लोकनेता न्यूज नेटवर्क

**हिमायतनगर । प्रभु कदम**

हिमायतनगर तालुक्यातील मौजे करंजी येथील दोन शेतकऱ्यांच्या शेतातील उसाच्या फडाला आज दिनांक १६ रोजी रविवारी भर दुपारी शॉर्टसर्किट होऊन आग लागली .या आगीमध्ये पाच एकर ऊस जळून खाक झाला. उसजळताना शेतकऱ्यांनी आग विजवण्याचा आटोकाट प्रयत्न केला मात्र काहीच फायदा झाला नाही यामुळे शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. कारखान्याने ऊस नेण्यास



विलंब केल्याने शेतकऱ्याला नुकसानीचा सामना करावा लागला असल्याची या भागातील शेतकरी बोलून दाखवीत आहेत तसेच हिमायतनर शहर व तालुक्याच्या ग्रामीण भागातील अनेक विजेतारा ह्या जीर्ण झाले असून यांच्या दृष्टीकडे महावितरणचे संबंधित अधिकारी कर्मचारी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहेत त्यामुळे शॉर्टसर्किट होऊन आग लागून शेतकऱ्यांना यांचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे या दुर्घटनेत करंजी येथील शेतकरी रामराव पांडुरंग सूर्यवंशी आणि श्याम दिगंबर कदम या दोन शेतकऱ्यांच्या सर्वे नंबर ५८ .६३. ६५. मधील अंदाजे पाच चक्कर ऊस उजळून खाक झाला आहे या घटनेत शेतकऱ्यांचे लाखो रुपयाचे नुकसान झाले असून नुकसानीचा पंचनामा तात्काळ करून महावितरण विभागांनी नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. कारखान्यांनी ऊस नेण्यास विलंब केल्याने शेतकऱ्यांना नुकसानीचा सामना करावा लागला असल्याची या भागातील शेतकरी बोलून दाखवित आहेत..



मा. खा अशोकराव चव्हाण साहेबांचं धर्माबादकर यांच्या वतीने मनस्वी स्वागत करताना शेतकरी नेते मारोतराव पाटील कवळे गुरुजी (लोकनेता न्युज नेटवर्क नांदेड)

# ज्ञानश्री सायन्स क्लासेस मध्ये इयत्ता दहावीचा शुभेच्छा समारंभ संपन्न



लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

ज्ञानश्री सायन्स क्लासेस मध्ये सोमवारी दहावीच्या विद्यार्थ्यांच्या बोर्ड परीक्षेसाठी शुभेच्छा समारंभ ठेवण्यात आला होता.समारंभाच्या अध्यक्षस्थानी संचालक श्री.नाईक सर होते.यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रसिद्ध कवी माननिय प्रा.श्री हरिष हातवटे सर,मा.श्री वायाळ सर उपस्थित होते.यावेळी प्रा.हरिष हातवटे सर यांनी,हे माय तुझ्या साठी काय पण तुझ्या साठी काय पण,पाठी वरती हात ठेऊनी फक्त लढ म्हणा अशा वेगवेगळ्या कवितांचे सादरीकरण केले.तसेच विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन,भविष्यात व्यसनाधीन होऊ नका,महापुरुषांचे विचार योग्य पद्धतीने मनात रुजवा,जो खूप प्रयत्न करतो त्याला यश हमखास मिळतेच,असे प्रेरणादायी विचार विद्यार्थ्यांपुढे मांडले.पुढे बोलताना ज्ञानश्री सायन्स क्लासेसचेच विद्यार्थी तालुक्यात प्रथम येतील अशी इच्छा व्यक्त केली. शुभेच्छा समारंभामध्ये इ.दहावीच्या हमजा शेख,सानिया शेख,अदिती निकाळजे या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले.शेवटी अध्यक्षीय मनोगत श्री.नाईक सर यांनी मांडले.कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन इयत्ता नववीच्या विद्यार्थिनींनी केले होते. अतिशय छान सूत्रसंचालन कुमारी अनुष्का धोंडे,स्नेहल धोंडे आणि स्वरांजली भवर यांनी केले.आणि शेवटी आभार इ.नववी ची विद्यार्थीनी आयमन शेख हिने मानले.

# एक भेट ठरली ग्रेट भेट!




लोकनेता न्यूज नेटवर्क

**नाशिक । वृत्तसेवा**

कवी लेखक संपादक साहेबराव नंदन तात्या नाशिक यांच्या निवासस्थानी वेस्टीज प्रॉडक्ट्स आरोग्यवर्धक कंपनीच्या सेल्स विभागाच्या सौ. प्रतिभा बुवा* ह्या त्यांच्या सहकारी सौ. सुचिता नंदन यांच्या समवेत, प्रॉडक्ट्सची माहिती देण्यासाठी आल्या असता, त्यांनी स्वेच्छेने आपल्या सगर साहित्याचे प्रकाशने, कवी लेखक संपादक साहेबराव नंदन तात्या लिखित, संपादीत, सगर रत्न विशेषांक / सगर सेवार्थी अंक / सगर दिपोत्सव दिवाळी अंक / २२ / २३ /२४ / गावगाडा काव्य संग्रह / चरित्रात्मक परिसस्पर्श कादंबरी इ . साहित्य वाचावयास मागून घेतले. आपले आरोग्य आपल्या हाती, वेस्टीज तुमच्या साथी, भेटी प्रसंगी आपल्या साहित्याच्या प्रज्वलीत झाल्या वाती ! तीन तासाच्या सहवासात सुधृढ आरोग्यासाठीच्या काही टिप्स समजावून सांगितल्या. काहींचे डेमो सादर केले. चहापान नाश्ता येथेच्छ गावगाड्याच्या काट्याकुट्या धसकटाच्या बांधावरच्या गप्पा ते सासू सुन वितंड ! मायबोली अहिराणी मधून साहेबराव नंदन तात्या यांनी स्वःरचित कवितांचे भावविश्व उलगडून दाखवले. नंदन उभयंताच्या कर्तव्य तत्पर सेवा स्वागताचे त्यांनी भरभरून कौतूक केले. हास्य विनोदाच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक कौटूंबिक विषयांवर आपले मत व्यक्त केले. आजच्या भेटीत प्रतिभाजी भारावून गेल्या होत्या. आपल्या सगर साहित्याच्या पुढील स्नेहबंध अंकाच्या प्रकाशनासाठी येण्याची इच्छा व्यक्त केली. या प्रसंगी सौ. सरलाताई नंदन यांनी हळदी कुंकूचे वाणं लावले. या आजची भेट ग्रेट भेट ठरली. असे साहेबराव नंदन तात्या यांनी सांगितले.
























हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904